महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
☎ ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल ✉: cpromhadaoffice@gmail.com

===

जावक क्रमांक – ९८/३४८२५५३ दिनांक :- १२ ऑक्टोबर २०२६

प्रसिद्धिपत्रक

'म्हाडा'तर्फे पाच कृत्रिम बुद्धिमत्ताधारित सेवांचा प्रारंभ

'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते सेवांचे उद्घाटन

- शासकीय प्रक्रिया सुलभ होणार व नागरिकांना अधिक जलद व प्रभावी सेवा मिळणार
- आर्थिक ताळमेळ, दस्तऐवज व्यवस्थापन, भूखंडविषयक माहिती, नागरिक सेवा आणि ठरावांचा शोध अधिक सुलभ होणार

मुंबई, दि. १२ ऑक्टोबर २०२६ : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा) प्रशासकीय कार्यक्षमता वाढविणे, शासकीय प्रक्रिया सुलभ करणे आणि नागरिकांना अधिक जलद व प्रभावी सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित पाच डिजिटल सेवांचा आज 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.

यावेळी 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल म्हणाले की, शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Government Process Re-engineering–GPR) आणि कार्यपद्धती सुधारणांच्या व्यापक उपक्रमाचा हा एक भाग आहे. सदर उपक्रमाचा उद्देश केवळ कागदपत्रांचे डिजिटल स्वरूपात रूपांतर करणे नसून, प्रशासकीय प्रक्रियांच्या महत्त्वाच्या टप्प्यांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणे हा आहे. या सेवांमुळे पुनरावृत्तीच्या हाताळणीतील कामात कपात, प्रशासकीय प्रक्रिया आणि माहिती शोधण्याच्या वेळेत बचत, कामकाजातील अचूकता व सुसंगततेत वाढ, संस्थेकडे उपलब्ध असलेल्या माहितीचा अधिक प्रभावी वापर, नागरिकांना सेवा मिळविणे अधिक सुलभ होणे, नागरिकांच्या विनंत्या संबंधित विभागांकडे जलद पाठविणे, प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता व कार्यवाहीचा मागोवा घेण्याची सुविधा, भविष्यातील कृत्रिम बुद्धिमत्ताधारित सुशासनासाठी भक्कम पायाभरणी होणार असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले. या पाच सेवांचा प्रारंभ हा म्हाडाच्या डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ताधारित तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याचा 'म्हाडा'चा प्रयत्न असल्याचे श्री. जयस्वाल यांनी सांगितले.

कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI)आधारित म्हाडातील पाच डिजिटल सेवा

१. एकात्मिक नागरिक सुविधा केंद्र (Unified Citizen Facilitation Centre – CFC)

म्हाडातर्फे नागरिक सुविधा केंद्र (CFC) सुरू करण्यात आले असून नागरिकांना घरबसल्या म्हाडातील संबंधित अधिकारी, विभागाकडे पत्र, निवेदने, कागदपत्रे पाठवण्यासाठी CFC@home ही सुविधा काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आली आहे. सदर सुविधेत आणखी सुधारणा करून CFC @home मध्ये अर्जदारांसाठी AI आधारित दस्तऐवजाची छाननी सुविधा विकसित करण्यात आली आहे. सदर सुविधेद्वारे अर्जदाराने अपलोड केलेल्या कागदपत्रांचे विश्लेषण करून, संबंधित असलेल्या संभाव्य तीन अधिकारी, विभागांचे पर्याय अर्जदारास सुचवण्यात येतील. या सुविधेमुळे अर्जदारास योग्य अधिकारी, विभागाची निवड करणे सुलभ होऊन कागदपत्रे योग्य त्या ठिकाणी पाठवण्याची प्रक्रिया अधिक अचूक व जलद होण्यास मदत होणार आहे. तसेच अर्जदारास कोणत्या अधिकारी, विभागास पत्र पाठवावे याबाबत माहिती नसल्यास Not known हा पर्याय निवडण्याची सुविधा देण्यात आली आहे. सदर पर्याय निवडल्यानंतर संबंधित कागदपत्रे नागरिक सुविधा केंद्र पोर्टलवर प्राप्त होणार असून त्यानंतर नागरिक सुविधा केंद्रात नियुक्त करण्यात आलेल्या म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून सदर कागदपत्रे संबंधित अधिकारी, विभागाकडे पाठवण्यात येणार आहेत.

म्हाडाच्या डिजिटल सेवांशी एकात्मिक केलेल्या या सुविधेद्वारे नागरिकांना संवादात्मक माध्यमातून ई-ऑफिस प्रणालीतील पत्रांच्या स्थितीची माहिती जाणून घेता येईल. तसेच, ऑनलाइन नागरिक सुविधा केंद्राकडे प्राप्त झालेल्या

विनंत्यांसाठी संबंधित विभाग आणि जबाबदार अधिकाऱ्याची ओळख पटविण्यास कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत होईल. आपण पाठविलेले पत्र, निवेदन, कागदपत्रे कुठल्या अधिकारी,विभागाकडे कुठल्या टप्प्यावर आहेत याची माहिती अर्जदाराला ई-ऑफिस क्रमांकाने ट्रॅक करता येणार आहे.

२. **आर्थिक ताळमेळ प्रणाली** (Finance Reconciliation Engine)
म्हाडाच्या विविध विभागीय मंडळातील लेखा व वित्त विभागाला या प्रणालीच्या माध्यमातून बँक स्टेटमेंट, आरटीजीएस (RTGS) व्यवहार आणि रोकडवहीतील नोंदी यांचा ताळमेळ साधण्यास मदत होणार आहे. प्रणालीद्वारे जुळणाऱ्या व्यवहारांची स्वयंचलित ओळख केली जाईल, तर जुळणी न झालेल्या नोंदींची पडताळणी संबंधित वित्त विभागाला करता येईल. त्यामुळे हाताने कराव्या लागणाऱ्या कामात कपात होऊन आर्थिक नोंदींची अचूकता वाढण्यास मदत होईल.

३. **फाइल नामकरण व टॅगिंग प्रणाली** (Files Naming & Tagging)
सदर दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीद्वारे अपलोड केलेल्या फाइल्सचे स्वयंचलित वर्गीकरण व टॅगिंग म्हाडातील अधिकारी- कर्मचारी यांना करता येईल. फाइल्सना प्रमाणित पद्धतीने नावे देणे, आवश्यक दस्तऐवजांचा जलद शोध घेणे आणि ते सहज उपलब्ध करून घेणे शक्य होईल. याशिवाय, दस्तऐवजांचा सारांश मराठी व इंग्रजी भाषेत तयार करणे आणि सुरक्षित पद्धतीने माहितीची देवाणघेवाण करणेही शक्य होणार आहे.

४. **भूखंडविषयक माहितीसाठी आभासी सहाय्यक** (Virtual Assistant for Land Queries)
म्हाडाच्या भौगोलिक माहिती प्रणालीशी (GIS) संलग्न असलेल्या या कृत्रिम बुद्धिमत्ताधारित आभासी सहाय्यकाद्वारे वापरकर्त्यांना संवादात्मक पद्धतीने उपलब्ध भूखंडविषयक माहिती म्हाडातील अधिकारी- कर्मचारी यांना मिळविता येईल. त्यामुळे गुंतागुंतीच्या GIS नोंदींमध्ये स्वतः शोध घेण्याची आवश्यकता कमी होऊन संबंधित माहिती सहज उपलब्ध होईल.

५. **ठराव शोध व संलग्नता प्रणाली** (Resolution Extraction & Linking)
सदर प्रणालीद्वारे म्हाडाच्या बैठकींच्या दस्तऐवजांमधील यापूर्वी झालेले ठराव शोधून त्यांचे अनुक्रमणिका पद्धतीने वर्गीकरण केले जाईल. ठराव क्रमांक, विषय किंवा संबंधित माहितीच्या आधारे ठराव अधिकारी- कर्मचारी यांना शोधता येतील. तसेच, मूळ दस्तऐवजातील संबंधित पान किंवा विभाग थेट उघडता येईल. त्यामुळे आवश्यक ठरावांचा शोध घेण्यासाठी लागणारा वेळ कमी होईल.

###

स्वाक्षरीत/ -

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा (करिता)

Maharashtra Housing & Area Development Authority
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051.☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com

==

Outward No. : 98/3482553 Dt. October 12, 2026

Press Release

MHADA Launches Five Artificial Intelligence-Based Digital Services

Services inaugurated by Shri Sanjeev Jaiswal (IAS), Vice President and CEO, MHADA

- Government processes to become simpler, with faster and more efficient services for citizens
- Easier financial reconciliation, document management, access to land-related information, citizen services and retrieval of resolutions

Mumbai, October 12, 2026: Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) today launched five Artificial Intelligence (AI)-based digital services to enhance administrative efficiency, simplify government processes and provide faster and more effective services to citizens. The services were inaugurated by Mr. Sanjeev Jaiswal (IAS), Vice President and Chief Executive Officer of MHADA.

Speaking on the occasion, Mr. Jaiswal said that the initiative forms part of MHADA's broader programme of Government Process Re-engineering (GPR) and improvement of administrative procedures. The objective is not merely to digitise documents but also to use artificial intelligence effectively at key stages of administrative processes.

He stated that these services would help reduce repetitive manual work, save time in administrative procedures and information retrieval, improve accuracy and consistency in official work, and enable more effective use of information available with the Authority. They would also make it easier for citizens to access services, ensure faster forwarding of citizen requests to the concerned departments, enhance transparency and facilitate tracking of administrative action. The initiative would lay a strong foundation for the future adoption of AI-based good governance practices.

Mr. Jaiswal further stated that the launch of these five services marks an important milestone in MHADA's digital transformation. MHADA is committed to using AI-based technology to make its administrative functioning more efficient, transparent and citizen-centric.

Five AI-Based Digital Services Introduced by MHADA

1. **Unified Citizen Facilitation Centre (CFC)**

MHADA has established a Citizen Facilitation Centre (CFC) to make its services more accessible to citizens. A few months ago, the CFC@home facility was introduced to enable citizens to submit letters, representations and documents to the concerned MHADA officers and departments from their homes.

The facility has now been further enhanced with an AI-based document scrutiny feature. The system analyses documents uploaded by applicants and suggests up to three possible officers or departments relevant to the submitted documents. This will help applicants identify the appropriate officer or department and ensure that their documents are forwarded to the correct destination more accurately and quickly.

Applicants who are unsure about the concerned officer or department may select the "Not Known" option. In such cases, the documents will be received through the CFC portal and forwarded to the appropriate officer or department by MHADA officials assigned to the Citizen Facilitation Centre.

Integrated with MHADA's digital services, this facility will also enable citizens to obtain information about the status of letters submitted through the e-Office system through an interactive interface. Artificial intelligence will assist in identifying the concerned department and responsible officer for requests received through the online CFC.

Applicants will be able to track their letters, representations and documents using the e-Office number and check the officer or department with which the submission is pending at a particular stage.

2. **Finance Reconciliation Engine**

The Finance Reconciliation Engine will assist the Accounts and Finance Departments of MHADA's various regional boards in reconciling bank statements, Real Time Gross Settlement (RTGS) transactions and cashbook entries.

The system will automatically identify matching transactions, while unmatched entries can be examined and verified by the concerned Finance Department. This will reduce manual work and help improve the accuracy of financial records.

3. **File Naming and Tagging System**

The document management system will enable MHADA officers and employees to automatically classify and tag uploaded files.

It will facilitate standardised file naming, faster retrieval of required documents and easier access to records. The system will also support the preparation of document summaries in Marathi and English and enable secure information sharing.

4. **Virtual Assistant for Land Queries**

Integrated with MHADA's Geographic Information System (GIS), this AI-based virtual assistant will enable MHADA officers and employees to access available land-related information through an interactive interface.

The facility will reduce the need to search complex GIS records manually and make relevant information easier to access.

5. **Resolution Extraction and Linking System**

This system will identify past resolutions recorded in MHADA meeting documents and classify them through an indexed mechanism.

Officers and employees will be able to search for resolutions using resolution numbers, subjects or related information. The system will also allow users to directly access the relevant page or section of the original document.

This will reduce the time required to locate relevant resolutions and improve access to important administrative decisions.

###

Sd/-

Chief Public Relations Officer / MHADA (For)

Maharashtra Housing & Area Development Authority
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra
East, Mumbai-400051.☎022-55405066/77. Email :cpromhadaoffice@gmail.com
===

Outward No. : 97/3481629 Dt. 12 अक्टूबर 2026

प्रेस विज्ञप्ति

म्हाडा द्वारा कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित पाँच डिजिटल सेवाओं का शुभारंभ

म्हाडा के उपाध्यक्ष एवं मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) के हाथों सेवाओं का उद्घाटन

- सरकारी प्रक्रियाएँ होंगी सरल; नागरिकों को मिलेंगी अधिक तेज और प्रभावी सेवाएँ
- वित्तीय मिलान, दस्तावेज प्रबंधन, भूखंड संबंधी जानकारी, नागरिक सेवाओं तथा संकल्पों की खोज होगी आसान

मुंबई, दिनांक 12 अक्टूबर 2026: महाराष्ट्र गृहनिर्माण एवं क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) ने प्रशासनिक कार्यक्षमता बढ़ाने, सरकारी प्रक्रियाओं को सरल बनाने तथा नागरिकों को अधिक तेज और प्रभावी सेवाएँ उपलब्ध कराने के उद्देश्य से आज कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence–AI) आधारित पाँच डिजिटल सेवाओं का शुभारंभ किया। इन सेवाओं का उद्घाटन म्हाडा के उपाध्यक्ष एवं मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संजीव जयस्वाल (भा.प्र.से.) के हाथों किया गया।

इस अवसर पर श्री जयस्वाल ने कहा कि यह पहल सरकारी प्रक्रिया पुनर्रचना (Government Process Re-engineering–GPR) और कार्यप्रणाली में सुधार के व्यापक कार्यक्रम का हिस्सा है। इसका उद्देश्य केवल दस्तावेजों को डिजिटल स्वरूप में परिवर्तित करना नहीं, बल्कि प्रशासनिक प्रक्रियाओं के महत्वपूर्ण चरणों में कृत्रिम बुद्धिमत्ता का प्रभावी उपयोग करना है।

उन्होंने कहा कि इन सेवाओं से बार-बार किए जाने वाले मैनुअल कार्यों में कमी आएगी, प्रशासनिक प्रक्रियाओं और जानकारी खोजने में लगने वाला समय बचेगा तथा कामकाज में सटीकता और एकरूपता बढ़ेगी। साथ ही, प्राधिकरण के पास उपलब्ध जानकारी का अधिक प्रभावी उपयोग संभव होगा। नागरिकों के लिए सेवाएँ प्राप्त करना आसान होगा, उनके अनुरोध संबंधित विभागों तक तेजी से पहुँचाए जा सकेंगे तथा प्रशासनिक कार्यवाही में पारदर्शिता और उसकी स्थिति की निगरानी करने की सुविधा बेहतर होगी। यह पहल भविष्य में कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुशासन के लिए मजबूत आधार तैयार करेगी।

श्री जयस्वाल ने कहा कि इन पाँच सेवाओं का शुभारंभ म्हाडा के डिजिटल परिवर्तन की दिशा में एक महत्वपूर्ण कदम है। कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तकनीक के उपयोग से प्रशासनिक कामकाज को अधिक सक्षम, पारदर्शी और नागरिक-केंद्रित बनाने के लिए म्हाडा प्रयासरत है।

म्हाडा की पाँच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित डिजिटल सेवाएँ

1. एकीकृत नागरिक सुविधा केंद्र (Unified Citizen Facilitation Centre–CFC)

म्हाडा द्वारा नागरिकों को सुविधाजनक सेवाएँ उपलब्ध कराने के लिए नागरिक सुविधा केंद्र (CFC) शुरू किया गया है। कुछ महीने पहले CFC@home सुविधा शुरू की गई थी, जिसके माध्यम से नागरिक घर बैठे म्हाडा के संबंधित अधिकारियों और विभागों को पत्र, निवेदन तथा दस्तावेज भेज सकते हैं।

अब इस सुविधा को और बेहतर बनाते हुए इसमें AI आधारित दस्तावेज जाँच सुविधा विकसित की गई है। इस प्रणाली के माध्यम से आवेदक द्वारा अपलोड किए गए दस्तावेजों का विश्लेषण किया जाएगा और संबंधित संभावित तीन अधिकारियों या विभागों के विकल्प सुझाए जाएँगे। इससे आवेदक के लिए सही अधिकारी या विभाग का चयन करना आसान होगा और दस्तावेजों को उचित स्थान पर भेजने की प्रक्रिया अधिक सटीक एवं तेज होगी।

यदि आवेदक को संबंधित अधिकारी या विभाग की जानकारी नहीं है, तो वह “Not Known” विकल्प चुन सकता है। ऐसी स्थिति में दस्तावेज नागरिक सुविधा केंद्र के पोर्टल पर प्राप्त होंगे और केंद्र में नियुक्त म्हाडा के अधिकारी उन्हें संबंधित अधिकारी या विभाग तक पहुँचाएँगे।
म्हाडा की डिजिटल सेवाओं के साथ एकीकृत इस सुविधा के माध्यम से नागरिक संवादात्मक प्रणाली द्वारा ई-ऑफिस में प्रस्तुत पत्रों की स्थिति की जानकारी भी प्राप्त कर सकेंगे। ऑनलाइन नागरिक सुविधा केंद्र में प्राप्त अनुरोधों के लिए संबंधित विभाग और जिम्मेदार अधिकारी की पहचान करने में कृत्रिम बुद्धिमत्ता सहायता करेगी।
आवेदक ई-ऑफिस नंबर के माध्यम से अपने पत्र, निवेदन और दस्तावेजों की स्थिति की जानकारी प्राप्त कर सकेंगे। इससे यह पता लगाया जा सकेगा कि संबंधित दस्तावेज किस अधिकारी या विभाग के पास और किस चरण में हैं।

2. वित्तीय मिलान प्रणाली (Finance Reconciliation Engine)

इस प्रणाली से म्हाडा के विभिन्न मंडलों के लेखा एवं वित्त विभागों को बैंक स्टेटमेंट, रियल टाइम ग्रॉस सेटलमेंट (RTGS) लेनदेन और रोकड़ बही की प्रविष्टियों का मिलान करने में सहायता मिलेगी।
प्रणाली के माध्यम से मेल खाने वाले लेनदेन की स्वतः पहचान की जाएगी। जिन प्रविष्टियों का मिलान नहीं होगा, उनकी जाँच संबंधित वित्त विभाग कर सकेगा। इससे मैनुअल कार्य में कमी आएगी और वित्तीय अभिलेखों की सटीकता बढ़ाने में मदद मिलेगी।

3. फाइल नामकरण एवं टैगिंग प्रणाली (File Naming and Tagging System)

इस दस्तावेज प्रबंधन प्रणाली के माध्यम से म्हाडा के अधिकारी और कर्मचारी अपलोड की गई फाइलों का स्वचालित वर्गीकरण और टैगिंग कर सकेंगे।
इससे फाइलों को निर्धारित मानक के अनुसार नाम देना, आवश्यक दस्तावेजों को तेजी से खोजना और उन्हें आसानी से उपलब्ध कराना संभव होगा। इसके अतिरिक्त, दस्तावेजों का सारांश मराठी और अंग्रेजी में तैयार किया जा सकेगा तथा सुरक्षित तरीके से जानकारी साझा करने में भी सुविधा होगी।

4. भूखंड संबंधी जानकारी के लिए वर्चुअल असिस्टेंट (Virtual Assistant for Land Queries)

म्हाडा की भौगोलिक सूचना प्रणाली (Geographic Information System–GIS) से जुड़ा यह AI आधारित वर्चुअल असिस्टेंट अधिकारियों और कर्मचारियों को संवादात्मक माध्यम से उपलब्ध भूखंड संबंधी जानकारी प्राप्त करने की सुविधा देगा।
इससे जटिल GIS अभिलेखों में मैनुअल तरीके से जानकारी खोजने की आवश्यकता कम होगी और संबंधित जानकारी आसानी से उपलब्ध हो सकेगी।

5. संकल्प खोज एवं लिंकिंग प्रणाली (Resolution Extraction and Linking System)

इस प्रणाली के माध्यम से म्हाडा की बैठकों के दस्तावेजों में दर्ज पूर्व के संकल्पों की पहचान कर उन्हें अनुक्रमणिका के आधार पर वर्गीकृत किया जाएगा।
अधिकारी और कर्मचारी संकल्प संख्या, विषय अथवा संबंधित जानकारी के आधार पर आवश्यक संकल्प खोज सकेंगे। साथ ही, मूल दस्तावेज के संबंधित पृष्ठ या भाग को सीधे खोला जा सकेगा।
इससे आवश्यक संकल्पों को खोजने में लगने वाला समय कम होगा और महत्वपूर्ण प्रशासनिक निर्णयों तक पहुँच अधिक आसान होगी।

###

Sd/-
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा (के लिए)

BUILDING A SMARTER,
MORE CONNECTED MHADA
Transforming Services. Empowering Citizens.
Enabling Smarter Operations.
DOCUMENTS
Faster
DATA

MHADA+AI
BUILDING A SMARTER,
MORE CONNECTED MHADA
म्हाडा
MHADA
MHADA+AI